सायं दैनिक
ज्योतिर्गमय

# कृषी विद्यालय अकोट येथे साइबर सुरक्षा जागरूकता अभियानाचे आयोजन

योगेश मेहरे

अकोट : अकोट येथील कृषी वीद्यालय येथे साइबर सुरक्षा जागरूकता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते . या अभियानामध्ये विद्यार्थ्यांना इंटरनेटवरील धोके, सुरक्षितता उपाययोजना आणि सोशल मीडियाचा सुरक्षित वापर सायबर क्राईम याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले हा कार्यक्रम किक हिल फाऊनडेशन पुणे आणि महाराष्ट सायबर यांच्या सहयोगाने व शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जगदीश साबु आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. यावेळी शंकरलाल खंडेलवाल विद्यालयातील विद्यार्थी सुमित संजय सपकाळ व अनिकेत भूडके या मुलांनी मार्गदर्शन केले वाढती गुन्हेगारी लक्षात घेता व वाढता सोशल मीडियाचा वापर लक्षात घेता आपण ऑनलाइन फसवणुकीला बळी पडत आहोत . तसेच आपण सोशल मीडियावर आपले जे वैयक्तिक फोटो माहिती शेअर करतो तिचा



सुद्धा गैरवापर होताना मोठ्या प्रमाणात दिसत आहे.त्यासोबतच ऑनलाइन फ्रॉड कॉल बँक मधून ऑटोमॅटिक गायब होणारी रक्कम कशाप्रकारे फ्रौड करून काढल्या जाते. तसेच विद्यार्थी लहान वयापासून मोबाईल मुळे वेडी झालेली आहेत एक प्रकारचं महाभयंकर लागलेला मोबाईलच्या व्यसन सोडवण्यासाठी अकोट येथील कृषी विद्यालय येथे सायबर क्राईम बाबत मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते या कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेचे मुख्याध्यापक रावणकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, आजच्या डिजिटल युगात इंटरनेटचा वापर अपरिहार्य झाला आहे, पण त्याचबरोबर त्यातील धोके ओळखून सुरक्षितता पाळणे अत्यंत आवश्यक आहे.ठकार्यक्रमात विद्यार्थ्यांना विविध सत्रांद्वारे इंटरनेट सुरक्षितता, सोशल मीडिया सुरक्षितता. पासवर्ड सुरक्षितता,फिशिंग आणि स्कॅम्स अशी माहिती देण्यात आली.विद्यार्थ्यांना साइबर सुरक्षा तज्ज्ञांच्या मार्गदर्शनात विविध प्रात्यक्षिके देखील दाखविण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांनी साइबर सुरक्षा उपाययोजनांचे महत्त्व ओळखले आणि त्यांना प्रत्यक्षात कसे अमलात आणावे हे शिकले. शाळेचे मुख्याध्यापक यांनी सांगितले की, ठआम्ही या प्रकारच्या अभियानांद्वारे विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि जबाबदार इंटरनेट वापरकर्ता बनविण्याचा प्रयत्न करतो.ठविद्यार्थ्यांनीही या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.आम्हाला इंटरनेटचा योग्य आणि सुरक्षित वापर करण्याबद्दल खूप काही शिकायला मिळाले असे विद्यार्थ्यांनी सांगितले.